# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(निवडणूक विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४


जा.क्र. गो.वि./निवि/७०/२०२२ | दि. २२/०७/२०२२

# निवडणूक अधिसुचना

## अधिसभा, विद्यापरीषद व अभ्यास मंडळ या प्राधिकरणांचा निवडणूक कार्यक्रम - 2022

या अधिसुचनेद्वारे सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016, मधील अधिसभा कलम 28(2)(ण), 28(2)(त), 28(2)(द), 28(2)(ध), 28(2)(न), विद्या परीषद 32(3)(छ) व अभ्यासमंडळ 40(2) (ग) नुसार विविध गटातून गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या अनुक्रमे अधिसभा, विद्यापरीषद व अभ्यासमंडळ या प्राधिकरणांवर सदस्य निवडून देण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन 2017 चा एकरूप परिनियम क्रमांक 1, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 109 दिनांक 28 एप्रील 2017, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 125 दिनांक 17 मे 2017 आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली निर्देश क्रमांक 15 of 2022, 15-A of 2022, 15-B of 2022, 15-C of 2022, 15-D of 2022, 15-E of 2022, 15-F of 2022, 15-G of 2022, 15-H of 2022, 15-I of 2022, 15-J of 2022, 15-K of 2022, 15-L of 2022, 15-M of 2022, 15-N of 2022, 15-O of 2022, 15-P of 2022, 15-Q of 2022, 15-R of 2022, 15-S of 2022, 15-T of 2022, 15-U of 2022 आणि निदेश क्रमांक 16 Of 2022, 17 Of 2022, तसेच यासंदर्भात विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेली अधिसूचना क्रमांक गोविग /निवि/14/2022 दिनांक 27-06-2022, अधिसूचना क्रमांक गोवि/निवि/21/2022 दिनांक 04-07-2022 आणि अधिसूचना क्रमांक गोवि/निवि/68/2022 दिनांक 19-07-2022 नुसार खाली नमुद सर्व निर्वाचन गटांच्या मतदार याद्या प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सबब मा.कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम घोषीत करण्यात येत आहे.

अधिसभा, विद्यापरीषद आणि अभ्यासमंडळ या कार्यकारीणीवर निवडणूकीद्वारे निवडून येण्याकरीता असलेले निर्वाचन गट

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विवरण</th><th>प्राधीकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीच्या पात्रता शर्ती</th></tr>
<tr><td>1.</td><td>अधिसभा — कलम 28<br>निर्वाचन गट — प्राचार्य : एकूण 10 जागा<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 28(2)(ण) नुसार अधिसभेवर प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परीषदेचे (नॅक) किंवा, यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाने अधिस्विकृती दिलेल्या संलग्न, संचालीत व स्वायत्त महाविद्यालयांचे 10 प्राचार्य, त्यापैकी प्रत्येकी 1 अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महीला असेल.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जागा</th><th>आरक्षण वर्ग</th></tr>
<tr><td>1</td><td>05</td><td>खुला</td></tr>
<tr><td>2</td><td>01</td><td>अनुसूचीत जाती</td></tr>
<tr><td>3</td><td>01</td><td>अनुसूचीत जमाती</td></tr>
<tr><td>4</td><td>01</td><td>निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती</td></tr>
<tr><td>5</td><td>01</td><td>इतर मागासवर्ग</td></tr>
<tr><td>6</td><td>01</td><td>महीला</td></tr>
</table>
विद्यापीठ निदेश क्र. 15-A of 2022</td><td>प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले —<br>(अ) प्राचार्य म्हणून दिनांक 13 ऑक्टोंबर 2000 पुर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा.<br>(ब) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परीषदेचे किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाचे वैध अधिस्विकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा.<br>(क) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाज एकूण किमान 5 वर्षे केलेले असावे.<br>(ड) आरक्षीत प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र.</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td>2.</td>
<td>
अधिसभा — कलम 28<br>
निर्वाचन गट — व्यवस्थापनाचे प्रतिनिधी : एकूण 06 जागा<br><br>
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 28(2)(त) नुसार अधिसभेवर संलग्न महाविद्यालये किंवा परीसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी यापैकी किमान एक विद्यापीठाच्या निदेश क्रमांक 15 (बी) 2022 कलम 7 नुसार अनुसूचीत जमाती या प्रवर्गातील एक व्यक्ती, तसेच निदेश क्रमांक 15 (बी) 2022 कलम 4 नुसार एक महीला असेल
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जागा</th><th>आरक्षण प्रवर्ग</th></tr>
<tr><td>1</td><td>04</td><td>खुला</td></tr>
<tr><td>2</td><td>01</td><td>अनुसूचीत जमाती</td></tr>
<tr><td>3</td><td>01</td><td>महीला</td></tr>
</table>
<br>
विद्यापीठ निदेश क्र. 15-B of 2022
</td>
<td>
संलग्न महाविद्यालय अथवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले —<br>
(अ) स्नातक पदवी धारण केलेला असावा<br>
(आ) व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा / व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असावा.<br>
(इ) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परीषदेचे किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे.<br>
(ई) आरक्षीत प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र
</td>
</tr>
<tr>
<td>3.</td>
<td>
अधिसभा — कलम 28<br>
निर्वाचन गट — महाविद्यालय अध्यापक : एकूण 10 जागा<br>
(प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्या खेरीज इतर)<br>
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 28(2)(द) नुसार अधिसभेवर दहा अध्यापक निवडून देण्याकरीता प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्या खेरीज इतर अध्यापक गटाने त्यांच्या मधून अधिसभेवर निवडून द्यावयाचे दहा अध्यापक ज्यापैकी प्रत्येकी एक अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महीला असेल.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जागा</th><th>आरक्षण वर्ग</th></tr>
<tr><td>1</td><td>05</td><td>खुला</td></tr>
<tr><td>2</td><td>01</td><td>अनुसूचीत जाती</td></tr>
<tr><td>3</td><td>01</td><td>अनुसूचीत जमाती</td></tr>
<tr><td>4</td><td>01</td><td>निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती</td></tr>
<tr><td>5</td><td>01</td><td>इतर मागासवर्ग</td></tr>
<tr><td>6</td><td>01</td><td>महीला</td></tr>
</table>
विद्यापीठ निदेश क्र. 15-C of 2022
</td>
<td>
अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले —<br>
अ) पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,<br>
किंवा<br>
एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा.<br><br>
ब) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.<br><br>
क) आरक्षीत प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र.
</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>4.</td>
<td>अधिसभा - कलम 28<br>निर्वाचन गट –, विद्यापीठ अध्यापक : एकूण 03 जागा<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 28(2)(ध) नुसार अधिसभेवर विद्यापीठ अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे तीन अध्यापक, ज्यापैकी एक आळीपाळीने अनुसूचीत जाती किंवा अनुसूचीत जमाती किंवा निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यातील व्यक्ती असेल आणि एक महीला असेल.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जागा</th><th>आरक्षण प्रवर्ग</th></tr>
<tr><td>1</td><td>01</td><td>खुला</td></tr>
<tr><td>2</td><td>01</td><td>अनुसूचीत जमाती</td></tr>
<tr><td>3</td><td>01</td><td>महीला</td></tr>
</table>
<br>विद्यापीठ निदेश क्र. 15-D of 2022</td>
<td>विद्यापीठाच्या अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले –<br>अ) पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,<br><br>ब) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.<br><br>क) आरक्षीत प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र.</td>
</tr>
<tr>
<td>5.</td>
<td>अधिसभा – कलम 28<br>निर्वाचन गट – नोंदणीकृत पदवीधर गट : एकूण 10 जागा<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 28(2)(न) नुसार नोंदणीकृत पदवीधर गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे, नामनिर्देशनाच्या दिनांकाच्या किमान पाच वर्षे अगोदर पदवी प्राप्त केलेले दहा नोंदणीकृत पदवीधर, ज्यापैकी प्रत्येकी एक अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग यातील व्यक्ती असेल आणि एक महीला असेल.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जागा</th><th>आरक्षण वर्ग</th></tr>
<tr><td>1</td><td>05</td><td>खुला</td></tr>
<tr><td>2</td><td>01</td><td>अनुसूचीत जाती</td></tr>
<tr><td>3</td><td>01</td><td>अनुसूचीत जमाती</td></tr>
<tr><td>4</td><td>01</td><td>निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती</td></tr>
<tr><td>5</td><td>01</td><td>इतर मागासवर्ग</td></tr>
<tr><td>6</td><td>01</td><td>महीला</td></tr>
</table>
विद्यापीठ निदेश क्र 15-E of 2022</td>
<td>नोंदणीकृत पदवीधर गटाने निवडून दिलेले –<br>अ) नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी किमान पाच वर्षे आधी पदवीधर झालेला असावा. यामध्ये अध्यापक (नियमित किंवा कंत्राटी तत्वारील अध्यापकांचा मग त्यांचा अध्यापकीय अनुभव काहीही असो) प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम 28 (2) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या पदवीधरांचा समावेश होणार नाही.<br>ब) आरक्षीत प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>6.</td>
<td>

**विद्यापरीषद — कलम 32**

**निर्वाचन गट — महाविद्यालय अध्यापकगट : एकूण08 जागा**

(प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन अध्यापक)

तसेच कलम 32(3)(छ) नुसार अध्यापक गटाने आपल्या मधून विद्यापरीषदेवर निवडून द्यावयाचे पंधरा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन अध्यापक, त्यापैकी एक अनुसूचीत जातीची किंवा अनुसूचीत जमातीची किंवा निरधीसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाचे व्यक्ती असेल परंतू प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. परंतू या खंडान्वये प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल अशी महीला असेल.

त्याप्रमाणे विद्यापीठ अधिसूचना क्रमांक गोंवि/निवि/69/2022 दिनांक 20.07.2022 अन्वये विद्यापरीषदेवरील विद्याशाखानिहाय प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विद्याशाखा</th><th>आरक्षण वर्ग</th></tr>
<tr><td>1</td><td>विज्ञान व तंत्रज्ञान</td><td>खुला</td></tr>
<tr><td>2</td><td>वाणिज्य व व्यवस्थापन</td><td>खुला</td></tr>
<tr><td>3</td><td>मानवविज्ञान</td><td>खुला</td></tr>
<tr><td>4</td><td>आंतरविज्ञानशाखीय अभ्यास</td><td>खुला (महीला)</td></tr>
<tr><td>5</td><td>विज्ञान व तंत्रज्ञान</td><td>इतर मागासवर्ग</td></tr>
<tr><td>6</td><td>वाणिज्य व व्यवस्थापन</td><td>अनुसूचित जमाती</td></tr>
<tr><td>7</td><td>मानवविज्ञान</td><td>निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती)<br>किंवा भटक्या जमाती</td></tr>
<tr><td>8</td><td>आंतरविज्ञानशाखीय अभ्यास</td><td>अनुसूचीत जाती</td></tr>
</table>

विद्यापीठ निदेश क्र. 15-F of 2022

</td>
<td>

**अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले —**

अ) पीएच.डी. पदविधारक असावा<br>
आ) एकूण किमान पंधरा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा<br>
इ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असेल ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल.<br>
ई) किमान दोन पाठ्यपुस्तकांचा / संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मुळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ञ परीक्षीत जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत.<br>
उ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.<br>
ऊ) आरक्षीत प्रवर्गाकरीता जात वैधता प्रमाणपत्र

</td>
</tr>
<tr>
<td>7.</td>
<td>

**अभ्यासमंडळ — कलम 40**

**निर्वाचन गट — संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परीसंस्थामधील विभाग प्रमुख : एकूण जाग 59 X 3 = 177 (प्रत्येक अभ्यासमंडळाच्या तीन जागा प्रमाणे)**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 40(2)(ग) नुसार संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखाच्या गटामधून निवडून द्यावयाचे संलग्न महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील तीन विभागप्रमुख

विद्यापीठ निदेश क्रमांक 15-G of 2022

</td>
<td>

**संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या विभाग प्रमुखांच्या गटामधून निवडून दिलेले —**

अ) प्राचार्य म्हणून 13 ऑक्टोंबर 2000 पुर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा.<br>
आ) पदवीपूर्व स्तरावर एकूण किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा.<br>
इ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

</td>
</tr>
</table>

**अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळ या प्राधिकरणांच्या निवडणूक**
**कार्यक्रमाचे वेळापत्रक**

| अ.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| 1. | कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेद्वारा सर्व निर्वाचण गणांची अंतीम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक 19-07-2022 |
| 2. | कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेद्वारा वर नमुद निर्वाचण गणांच्या सदस्यांची निवडणूकीद्वारे निवड करण्यास्तव निर्गमित करण्यात येणाऱ्या अधिसुचनेचा दिनांक | दिनांक 22-07-2022 |
| 3. | वर नमुद विविध निर्वाचण गटांच्या सदस्य निवडीसाठी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्याचा अंतीम दिनांक व वेळ | दिनांक 02-08-2022<br>वेळ सायं.5.00 वाजेपर्यंत |
| 4. | वर नमुद विविध निर्वाचण गटांच्या सदस्य निवडीसाठी उमेदवारांनी सादर केलेल्या नामनिर्देशन अर्जाची छाननी करण्याचा दिनांक | दिनांक 03-08-2022 |
| 5. | वर नमुद विविध निर्वाचण गटांच्या वैध उमेदवारांची यादी घोषीत करण्याचा दिनांक | दिनांक 04-08-2022 |
| 6. | वर नमुद विविध निर्वाचण गटांच्या उमेदवारी अर्जाच्या छाननी उपरांत मा.कुलगुरू महोदयाकडे अपील दाखल करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक 05-08-2022<br>वेळ सायं.5.00 वाजेपर्यंत |
| 7. | वर नमुद विविध निर्वाचण गटांच्या मा.कुलगुरू महोदयाद्वारे प्राप्त झालेल्या अपीलांवर निर्णय देण्याचा दिनांक | दिनांक 06-08-2022 |
| 8. | वर नमुद विविध निर्वाचण गटांसाठी सादर केलेला उमेदवारी अर्ज परत घेण्याचा दिनांक व वेळ | दिनांक 07-08-2022<br>वेळ सायं.5.00 वाजेपर्यंत |
| 9. | वर नमुद विविध निर्वाचण गटांसाठी उमेदवार असलेल्या व्यक्तींची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक 08-08-2022 |
| 10. | अ) वर नमुद विविध निर्वाचण गटांसाठी मतदान करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक : 21-08-2022<br>सका. 8.00 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत |
| | ब) स्वतंत्ररित्या घोषीत होणाऱ्या अतीसंवेदनशिल मतदान केंद्रातील मतदानाची वेळ | दिनांक : 21-08-2022<br>सका. 7.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत |
| 11. | वर नमुद विविध निर्वाचण गटांसाठी झालेल्या मतदानाची मोहरबंद मतपेटी स्विकारण्याचा दिनांक | दिनांक 21-08-2022<br>सायं. 5.00 वाजेनंतर व<br>दिनांक 22-08-2022 |
| 12. | वर नमुद विविध निर्वाचण गटांसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणी करून निकाल घोषीत करण्याचा दिनांक | दिनांक 23-08-2022 |

मतमोजणी स्थळ - गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महत्वाची सुचना – अतिसंवेदनशिल मतदान केंद्राच्या नावाबाबतची यादी "**मतदारांना सुचना**" या शिर्षा अंतर्गत अधिसूचनेत नमुद राहील.

**सुचना –**

1. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016, मधील कलम 28(2)(ण), 28(2)(त), 28(2)(द), 28(2)(ध), 28(2)(न), 32(3)(छ) व 40(2)(ग) नुसार विविध गटातून गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या अनुक्रमे अधिसभा, विद्यापरीषद व अभ्यासमंडळावर सदस्य निवडून देण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन 2017 चा एकरूप परिनियम क्रमांक 1, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 109 दिनांक 28 एप्रील 2017, महाराष्ट्र

शासन राजपत्र असाधारण क्रमांक 125 दिनांक 17 मे 2017 आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली निर्देश क्रमांक 15 of 2022, 15-A of 2022, 15-B of 2022, 15-C of 2022, 15-D of 2022, 15-E of 2022, 15-F of 2022, 15-G of 2022, 15-H of 2022, 15-I of 2022, 15-J of 2022, 15-K of 2022, 15-L of 2022, 15-M of 2022, 15-N of 2022, 15-O of 2022, 15-P of 2022, 15-Q of 2022, 15-R of 2022, 15-S of 2022, 15-T of 2022, 15-U of 2022 आणि निदेश क्रमांक 16 Of 2022, 17 Of 2022 विद्यापीठ संकेतस्थळ www.unigug.ac.in पोर्टलवर व विद्यापीठाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

2. वर नमुद सर्व निर्वाचक गटाच्या मतदार याद्या तसेच संबंधीत निर्वाचक गटाचे नामांकन अर्ज त्याच प्रमाणे नामांकन अर्ज परत घेण्यासंदर्भातील नोटीस इत्यादी संबंधीत निदेशाद्वारे विद्यापीठ संकेतस्थळावरील www.unigug.ac.in पोर्टलवर व विद्यापीठाच्या कार्यालयात वर नमुद मुदतीनुसार उपलब्ध आहेत.

3. वर नमुद सर्व निर्वाचक गटाच्या अंतीम मतदार याद्यांच्या मुद्रीत प्रती संबंधीताने अर्ज केल्यावर व विद्यापीठात विहीत केलेले शुल्क प्रदान केल्यावर विद्यापीठातून उपलब्ध करून देण्यात येतील.

4. विद्यापीठ संकेतस्थळावरील www.unigug.ac.in पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्व मतदार याद्या तसेच नामांकन अर्ज आणि नामांकन अर्ज परत घेण्यासंदर्भातील नोटीस विनामुल्य डाऊनलोड करता येऊ शकतील.

मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये

**(डॉ. अनिल हिरेखन)**
कुलसचिव तथा
निवडणूक निर्वाचनअधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

स्थळ – गडचिरोली
दिनांक – 22-07-2022

प्रतिलीपी माहीती व योग्य कार्यवाहीस्तव सादर :

1. मा.कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2. मा.प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3. मा.पोलीस अधिक्षक, गडचिरोली व चंद्रपुर जिल्हा
4. सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयांचे अध्यापक, पदव्युत्तर अध्यापक, मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक आणि अध्यापक
5. सर्व संलग्नीत महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे व्यवस्थापन प्रतिनिधी
6. विद्यापीठाचे सर्व अध्यापक
7. विद्यापीठातील सर्व नोंदणीकृत पदविधर
8. विद्यापीठातील सर्व अधिकारी
9. मा.जिल्हा माहीती अधिकारी, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हा
10. गडचिरोली, चंद्रपूर जिल्हयातून प्रसिध्द होणाऱ्या दैनिक वर्तमान पत्रांचे सर्व मा.संपादक-सविनय विनंती आहे की, उपरोक्त अधिसूचना आपल्या लोकप्रिय वर्तमान पत्रात बातमी म्हणून प्रसिध्द करण्यास्तव
11. www.unigug.ac.in विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव